दै.बीड www.beedsuperfast.com

# सुपरफास्ट

• संपादक : अतुल शंकरराव जाधव •

• beedsuperfastgmail.com •

रमजान –17
आज का इफ्तार 06:38
कल की सहर 05:19

▪ बीड (महाराष्ट्र) ▪ वर्ष ४ ▪ अंक ६४ ▪ शनिवार दि. ०७ मार्च, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2023/84694 ▪ पाने ४ ▪ किंमत ४ रु.

▪ BEED (Maharashtra) ▪ Year-4 ▪ Issue-64 ▪ Saturaday 07 March, 2026 ▪ RNI : MAHMAR/2023/84694 ▪ Pages 4 ▪ Price 4

# अखेर शेतकऱ्यांना कर्जमाफी
# फडणवीसांची मोठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी शेतकरी कर्जमाफी संदर्भात मोठी घोषणा केली आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी समिती स्थापन केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेनुसार आता ज्या शेतकऱ्यांचं दोन लाखांपर्यंतच कर्ज थकीत आहे, त्यांना आता कर्जमाफी मिळणार आहे. एवढंच नाही तर जे शेतकरी कर्ज घेऊन नियमित परतफेड करतात अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल अशी घोषणाही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. बँकिंग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेऊ. समितीच्या शिफारशीनुसार दीर्घकालीन योजना करण्यात येणार आहेत. समितीच्या शिफारशी आणि निकषानुसार कर्जमुक्त करण्यासाठी दीर्घकालीन योजना केल्या जातील, अशी घोषणाही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा चांगलाच तापला होता. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी अशी मागणी विरोधकांकडून सुरू होती. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी नागपुरात प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी मोठं आंदोलन देखील केलं होतं. त्यावेळी सरकारकडून शेतकऱ्यांना » पान २ वर



### शेतकऱ्यांसाठी इतर घोषणा

आगामी दोन वर्षांमध्ये महाराष्ट्रात नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे. त्यासोबतच महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येणार आहेत, यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



# बस स्टँड मागे तरुणाचा मृतदेह आढळला
## खूनाचा संशय; पोलिसांची घटनास्थळी धाव

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानक परिसरात आज शुक्रवारी सकाळी एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. बसस्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत ही धक्कादायक घटना घडली असून, मयत तरुणाची ओळख पटली असून मयत गांधी नगर भागातील असून त्याचे नाव नौशाद (वय २५ वर्ष) आहे. बीड जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून मारामाऱ्या, खून, चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. नेहमीच खूनाच्या घटना घडत असल्याने जिल्हा राज्यात बदनाम झाला आहे. आजही सकाळी शहरातून खळबळ उडवून देणारी घटना समोर आली आहे. आज शुक्रवारी सकाळच्या वेळी काही नागरिकांना बसस्थानकाच्या मागील मोकळ्या जागेत नौशाद पडलेला दिसून आला. लोकांनी पोलिसांना माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तातडीने मृतदेहाचा पंचनामा केला असून, परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. नौशादचा मृत्यू नेमका कसा झाला, याबाबत परिसरात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. नागरिकांकडून खुनाची शक्यता वर्तवली जात असतानाच, पोलिसांनी या प्रकरणी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर या घटनेचा सखोल तपास करत असून, लवकरच सत्य समोर येईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. हा भाग नेहमीच शहरात गुन्हेगारी कृत्यासाठी चर्चेत असतो, अनेक वेळा याच बसस्थानका मागील रस्त्यावर अनेकांना लुटले असून, काहींवर धारदार शस्त्रांचे वार झाले आहे. या घटनेने पुन्हा हा भाग चर्चेत आला असून, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या भागच असुरक्षित असल्याने याकडे प्रशासनाने हा भाग सुरक्षित कसा राहील याकडे लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे.



# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर'
## ७ मार्चला दौलावडगाव येथे शेतकरी भवनात आयोजन

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील महसूल मंडळ दौलावडगाव येथील शेतकरी भवनात दि. ७ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियानांतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील विविध महसूल मंडळांमध्ये वेगवेगळ्या दिवशी ही शिबिरे घेण्यात येणार असून, दि. १५ मे २०२७ पर्यंत हे अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार वैशाली पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रामुख्याने प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती करणे व संगणकीकृत सातबाऱ्याबाबत मार्गदर्शन, विविध प्रकारची प्रमाणपत्रे वितरित करणे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत मंजुरी आदेशांचे वितरण, ई-मोजणी, कृषी संचयन नोंदणी, ई-केवायसी प्रक्रिया, भूसंपादन विषयक मार्गदर्शन, तुकडेबंदी व्यवहार नियमित करणे तसेच बळीराजा

पाणंद रस्त्यांबाबत माहिती आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे » पान २ वर

# पोलीस पाटील मुलाखती दरम्यान उमेदवारांची आर्थिक लूट
## पाटोदा येथील झेरॉक्स चालकांकडून अवाजवी दर आकारणी – दरपत्रक लावण्याची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील भरती प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीसाठी मोठ्या संख्येने उमेदवार पाटोदा येथे दाखल झाले असताना, उपजिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही झेरॉक्स चालकांकडून उमेदवारांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. पाटोदा येथील उपजिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय व पंचायत समिती यांच्या समोरील झेरॉक्स केंद्रांवर एका झेरॉक्स प्रतीसाठी प्रत्यक्षात एक रुपया खर्च येत असताना पाच रुपये आकारले जात असल्याची तक्रार उमेदवारांनी केली आहे. मुलाखतीसाठी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती काढताना उमेदवारांकडून पाचपट दर आकारला जात असून, ही सरळसरळ आर्थिक लूट असल्याचे संतप्त उमेदवारांनी सांगितले. पोलीस पाटील मुलाखतीसाठी ग्रामीण भागातील, खेड्या-पाड्यातील अनेक तरुण मोठ्या अपेक्षेने व आर्थिक अडचणींवर मात करत पाटोदा येथे आले आहेत. काही जण शेतकरी कुटुंबातील असून प्रवास खर्च, जेवणखर्च आणि कागदपत्रांची पूर्तता यासाठी आधीच मोठा खर्च सहन करत आहेत. अशा परिस्थितीत झेरॉक्ससारख्या मूलभूत सेवेवर अवाजवी दर आकारले जात असल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, ही दरवाढ सर्व शासकीय कार्यालयांच्या समोरच उघडपणे होत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याची भावना उमेदवारांनी व्यक्त केली आहे. मुलाखतीसाठी तातडीने कागदपत्रे लागतात, त्यामुळे नाईलाजाने जास्त पैसे द्यावे लागतात, अशी खंत काही उमेदवारांनी व्यक्त केली. या प्रकारामुळे फक्त उमेदवारच नव्हे तर शेतकरी व सामान्य नागरिक देखील त्रस्त आहेत. दररोज विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांकडूनही याच पद्धतीने जादा दर आकारले जात असल्याची » पान २ वर

# बळीराजा पाणंद रस्ता योजनेसाठी शासन स्तरावरून निधीची तरतुद करावी
## आ. विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना ही महायुती शासनाने सुरु केलेली महत्वाकांक्षी योजना शेतकऱ्यांसाठी फलदायी ठरणारी आहे. खऱ्या अर्थाने शेतमाल वाहतुकीसाठी या योजनेचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. ग्रामीण भागात पायाभुत सुविधा वाढवून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना फायदेशीर ठरत आहे. मात्र या योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्ष नसल्याने निधीच्या तरतुदीची अडचण येत आहे. अपुऱ्या निधीमुळे योजनेची अंमलबजावणी सक्षमपणे होणार नाही, त्यामुळे शासनाने मुख्यमंत्री बळीराज पाणंद रस्ता योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करून निधीची विशेष तरतुद करावी अशी आग्रही मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी बुधवार, दि.४ मार्च रोजी सभागृहात विविध विषयांवरील चर्चेत सहभाग नोंदविला. आखाती देशात अडकलेल्या बीड जिल्ह्यातील पर्यटक आणि प्रवाशांना सुखरूप मायदेशी परत आणण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी त्यांनी केली. नियम २९३ अन्वये चर्चेत सहभाग घेताना आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्षाची निर्मिती करून निधीची विशेष तरतुद करावी अशी मागणी त्यांनी केली. » पान २ वर



# पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदावर लवकरच पदभरती – पंकजा मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभागातील नवीन आकृतीबंध ऑक्टोबर २०२४ मध्ये मंजूर झाल्यामुळे काही संवर्गातील पदसंख्या वाढली आहे. पदभरतीची प्रक्रिया गतीने सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात भरतीचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानपरिषदेत व्यक्त केला. विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री मुंडे म्हणाल्या की, वाढीव पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) सोबत सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार २५ एप्रिल २०२५ रोजी एलडीओ (पशुवैद्यकीय विकास अधिकारी) पदांची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी वर्ग-एक दर्जाच्या सहा सहाय्यक आयुक्तपदांची जाहिरातही काढण्यात आली आहे. परीक्षेसाठी पेपर सेटिंग प्रक्रियेसाठी तज्ज्ञ अधिकारी व प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असून पेपर सेटिंगचे काम पूर्ण होताच परीक्षा घेण्यात येईल, असेही मंत्री » पान २ वर



# येळंब घाट येथे टू व्हीलर चा अपघात

**येळंब घाट । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील येळंब घाट येथे ९.३० वाजता केज कडून येणाऱ्या टुव्हिलर या गाडीने रस्त्याच्या साईटला चालत असणाऱ्या येळंब घाट येथील कडूबा मिस्तरी या व्यक्तीला धडक दिली या धडकी मध्ये दोघेही गंभीर जखमी झाले त्यांना पुढील उपचारासाठी सदैव जनतेसाठी तत्पर असणारे तानाजी आबा कदम यांनी दोघांनाही तात्काळ स्वतः उचलुन नेकनुर येथील श्री कुटी रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करुन म्बुलन्स ने पुढील उपचारासाठी बीड ला पाठवले..

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती भीमराज नगर नूतन कार्यकरणी जाहीर
## अध्यक्षपदी विकास जोगदंड, सचिवपदी देवाभाऊ वडमारे

**बीड । प्रतिनिधी**

भीमराज नगर राजुरी वेस भागातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी विकास जोगदंड तर सचिवपदी देवाभाऊ वडमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

रविवार, दिनांक १ मार्च रोजी बौद्ध विहार येथे रिपाई युवा प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ही बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अमोल (आबा ) धनवे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये. रमेश गंगाधरे, अरुण » पान २ वर





# राज्यसभा निवडणुकीतून मविआचा फैसला

मन मोठे करून राज्यसभेची जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीसाठी किंवा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी सोडावी तर उद्या हे दोघे एकत्र राहतील पण आपण पुढे एकाकी पडलो तर काय, ही चिंता काँग्रेसला सतावत असावी. गुरुवारी राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मुदत संपताना राज्याच्या राजकारणाची पुढील दिशा ठरेल असे संकेत दिसत आहेत. काँग्रेस आणि शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही पक्ष महाविकास आघाडीला (मविआ) मिळू शकणाऱ्या एकमेव जागेसाठी आग्रही असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासाठी ते जो काही निर्णय घेतील त्यातून बरेच संकेत प्राप्त होतील. पवार यांनी अलीकडेच संसदीय कारकिर्दीच्या ६० व्या वर्षात पदार्पण केले. आता जर ते पुन्हा राज्यसभेत गेले तर पुढील वर्षी साठ वर्षे पूर्ण होतील. त्यांच्या निकटवर्तीयांना हा विक्रम पवार यांच्या नोंदवला जावा अशी इच्छा असेल. तामीळनाडूचे दिवंगत मुख्यमंत्री करुणानिधी सलग १३ विधानसभा निवडणुका जिंकत ६० वर्षे विधानसभा सदस्य राहिले. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहात ५० वर्षे कार्यरत होते. पण विधानसभा, विधान परिषद, लोकसभा आणि राज्यसभा या चारही सभागृहाचे सदस्यत्व ६० वर्षे भूषविणारे पवार एकमेव असतील. पवार यांनी उमेदवारीबाबतचे इरादे स्वतः स्पष्ट केलेले नाहीत. पण मंगळवारी सायंकाळी त्यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे व ज्येष्ठ नेते जयंत पाटील हे उध्दव ठाकरे यांच्या भेटीसाठी 'मातोश्री'वर जाऊन आले. तिथे पवार यांच्या उमेदवारीबाबत चर्चा झालीच असणार. शरद पवार यांच्या स्वभावाप्रमाणे स्वतःहून ते या विषयावर बोललेले नाहीत. त्यांच्या मनातले जाहीरपणे कोणी बोललेले नाही. मविआकडे एक उमेदवार आरामात निवडून आणण्याचे संख्याबळ असतानाही उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटचा दिवस जवळ येतानाही उमेदवार ठरत नाही. आणि तो ठरत नाही म्हणून भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील महायुतीचे उमेदवार जाहीर करणे लांबवले गेले. राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी ३६ मतांची गरज आहे. हे मतदान गोपनीय नसल्याने कोण कोणाला मत दिले हे लगेच कळते. महायुतीचे संख्याबळ पाहता त्यांचे सहा उमेदवार आरामात निवडून येतात शिवाय त्यांच्याकडे २४-२५ मते शिल्लक राहतात. शरद पवार स्वतः उमेदवार नसले तर कदाचित महायुती सातवा उमेदवार देण्याची शक्यता यामुळेच नाकारता येत नाही. दुसऱ्या बाजूला पवार स्वतः निवडणुकीसाठी उभे राहिले तर झाकली मूठ सव्वालाखाची असा काहीसा प्रकार मविआबाबत होणार आहे. पवार यांनी संसदीय कारकिर्दीच्या ६० व्या वर्षात अलीकडेच पदार्पण केले. तेव्हा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी समाजमाध्यमात 'एक्स'वर त्यांच्याबद्दल एक गौरवपर संदेश टाकला होता. याचा अर्थ शरद पवार पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर राष्ट्रवादीकडे असलेली जास्तीची मते त्यांच्याकडे वळविली जाण्याची शक्यता वाढते. पवार यांना मते देण्यात त्यांच्यापासून दूर केलेल्या राष्ट्रवादीला गैर वाटण्याचे कारण नाही. एकतर त्यांचे वय, राजकारणातील त्यांचे स्थान आणि त्यांना असलेली सहानुभूती पाहता त्यांच्या विरोधात राजकीय पाऊल उचलणे काहींना गैर वाटेल. तिकडे काँग्रेसला मात्र मविआला मिळू शकणाऱ्या एका जागेची आस लागली आहे. सध्या त्यांना राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद टिकविणे आवश्यक वाटते आहे. त्यासाठी किमान २५ म्हणजे एकूण सदस्यसंख्येच्या १० टक्के सदस्य असणे आवश्यक आहे. हे पद आपल्याकडेच असावे यासाठी त्यांना महाराष्ट्रातील राज्यसभेची एक जागा



आवश्यक वाटत असावी. ती गरज मविआतील इतर दोन पक्षांना वाटतेय का हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. एकतर मविआ आज प्रत्यक्षात आहे की केवळ कागदावर अस्तित्वात आहे हे विशेष आहे. मविआची स्थापना २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तास्थापनेसाठी झाली. त्यानंतर भाजपाने अशीकाही दमछाक सुरू केली की राजकीय अस्तित्वासाठी मविआतील तिनही पक्षांना सोबत राहणे आवश्यक वाटू लागले. भाजपाच्या चौफेर हल्ल्यामुळे रोजच आव्हानांना सामोरे जात असतानाही जनता त्यांच्या सोबत राहिली आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ३० जागा निवडून आल्या. त्यामुळे आता विधानसभा आपलीच अशा थाटात मविआचे नेते राहिले. त्यांच्यातील काहींचे महायुतीवर प्रेम आहे हे ही इतरांना कळत होते. पण जनमताचा रेटा आपल्यामागे आहे या भावनेने त्यांनी काही गोष्टींकडे दुर्लक्ष केले आणि विधानसभेला फटका बसला, चिरफळ्या उडाल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविताना मविआ एकसंध राहिली नाही. काही ठिकाणी काँग्रेसने वंचित बहुजन आघाडी तर काही ठिकाणी स्वतंत्रपणे वाट चोखाळली. शिवसेना उबाठाने बऱ्याच ठिकाणी स्वतंत्र निर्णय घेतले. मुंबईत त्यांनी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबरोबर युती केल्याने काँग्रेस सुरक्षित अंतरावर राहिली. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने अजित पवार यांचे नेतृत्व मान्य करत पुणे, पिंपरी चिंचवड व परभणी येथे युती केली आणि पुढची दिशा दाखविली. मविआतील दुरावा स्पष्ट दिसू लागला होता. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुणे व अन्य काही जिल्हा परिषदांत ही युती कायम ठरवत तुतारीऐवजी घड्याळ या चिन्हाखाली निवडणुका लढविण्याचा इरादा स्पष्ट होताच केवळ मविआ नव्हे तर महायुतीच्या गोटात वेगळी चर्चा सुरू झाली हे कोणी नाकारणार नाही. याचे प्रमुख कारण अजित पवार दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत उघड विधाने करू लागले होते. ते एकत्र येण्यामुळे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथील राजकीय गणिते बदलणार हे निश्चित होते. ते पुढच्या राजकारणाची दिशा ठरवणारे ठरले असते. पण मध्येच अजित पवार यांचे अपघाती निधन झाले आणि या शक्यतांना ब्रेक लागला. दोन्ही राष्ट्रवादीच्या काही नेत्यांच्या स्वतंत्र विधानांमुळे विलिनीकरणाच्या शक्यता दुरावत असल्याचे दिसत असले तरी काही आमदारांना, दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील नेते व कार्यकर्त्यांना अजूनही आशा आहे. त्यामुळेच की काय मविआच्या दोन मित्रपक्षांमध्ये वेगळीच भावना आहे. एकीकडे महायुतीतील भाजपाचे प्रमुख नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे पहिल्या फळीतील काही नेते विलिनीकरणाची चर्चा आपल्याला माहिती नव्हती असे बोलून दाखवतात तर दुसऱ्या बाजूला काँग्रेस व शिवसेना उबाठाची अशीच भावना असली तरी ते बोलून दाखवत नाहीत. आपल्याला विलिनीकरणाबाबत कल्पना दिली नाही तर पवार यांना राज्यसभेच्या उमेदवारीसाठी थेट पाठिंबा का द्या. त्यापेक्षा संख्याबळाच्या आधारावर या एका जागेवर दावा ठोका असा पवित्रा दोन्ही पक्षांनी स्वीकारला आहे. पण वस्तुस्थिती अशी की तिघे एकत्र आल्याशिवाय त्यांचा उमेदवार निवडून येत नाही. यापुढची राज्यसभेची निवडणूक २०२८ मध्ये आहे. त्यावेळची परिस्थिती काय असेल हे आज सांगता येत नाही म्हणून प्रत्येकजण आपापल्या परीने ही जागा आपल्या पदरात कशी पडेल यासाठी प्रयत्नशील आहे. पवार यांनी आता थांबायला हवे असे या दोन्ही पक्षातील प्रमुख नेत्यांना वाटू लागले आहे. २०२८ साली काय परिस्थिती असेल या विचाराने त्यांना ग्रासलेले दिसते. मन मोठे करून ही जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीसाठी किंवा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी सोडावी तर उद्या हे दोघे एकत्र राहतील पण आपण पुढे आपण एकाकी पडलो तर काय, ही चिंता काँग्रेसला सतावत असावी. विरोधकांच्या एकीचे काय होणार याचे उत्तर या निवडणुकीत मिळेल असे दिसते.

## पान १ आणि ४ वरुन...

### अखेर शेतकऱ्यांना कर्जमाफी...

कर्जमाफी देऊ असा शब्द देण्यात आला होता. अखेर आता याबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या शेतकऱ्यांचं कर्ज थकीत आहे, त्या शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. तसेच जे शेतकरी कर्ज घेऊन नियमित परतफेड करतात अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल अशी घोषणाही यावेळी करण्यात आली आहे.

### पोलीस पाटील मुलाखती...

चर्चा परिसरात आहे.उमेदवार व नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित झेरॉक्स केंद्रांची तपासणी करावी, अधिकृत दरपत्रक लावण्याचे आदेश द्यावेत आणि अवाजवी दर आकारणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. सरकारी भरती प्रक्रियेसारख्या संवेदनशील व पारदर्शक उपक्रमादरम्यान उमेदवारांची आर्थिक पिळवणूक होणे हे प्रशासनासाठी चिंताजनक बाब असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. आता जिल्हा प्रशासन या प्रकरणाची कितपत दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पशुसंवर्धन विभागातील ...

मुंडे यांनी सांगितले. त्याचबरोबर, एमपीएससीकडूनही भरती प्रक्रियेला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. पशुपर्यवेक्षकांची पदे जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येणार असून त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा झाली आहे. नवीन आकृतीबंधानुसार वाढलेल्या पदांची भरती अपरिहार्य आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया सुरू असून पुढील अधिवेशनापर्यंत मोठ्या प्रमाणात पदभरती पूर्ण होईल, असे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

### 'छत्रपती शिवाजी...

अध्यक्ष म्हणून आमदार सुरेश धस उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जोन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक उपस्थित राहणार आहेत. तसेच सन्माननीय उपस्थितीमध्ये आमदार भिमराव धोंडे, आमदार बाळासाहेब आजबे, आमदार साहेबराव दरेकर, उपविभागीय अधिकारी वशिमा शेख, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, कृषी अधिकारी गोरख तरटे, आरोग्य अधिकारी राजेंद्र तांदळे, नायब तहसीलदार पांडुरंग मांडेकर, नायब तहसीलदार अश्विनी पडोळे, नायब तहसीलदार प्रकाश शिरसेवाड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महसूल विभागाच्या वतीने शेतकरी बांधवांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गेवराई पोलिसांची नेकनूरमध्ये...

आहे. या सर्व दुचाकी एका टेम्पोत भरुन त्या गेवराई ठाण्याकडे रवाना झाल्या आहेत. अशी माहिती पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली. तसेच गेवराई पोलिसांची ही आतापर्यंत सर्वात मोठी कारवाई मानली जात असून याचे सर्वस्तरून कौतुक सुरु आहे. जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या वाढलेल्या घटना पाहता पहाटेच्या सुमारास तब्बल ५० पेक्षा जास्त चोरीच्या गाड्या नेकनूरमध्ये आढळून आल्याने पोलिसांच्या या कारवाईचे कौतुक होतं आहे. आरोपी कोण आहेत? ते चोऱ्या कशा पद्धतीने करायचे? एकूण गाड्या नेमक्या किती याचा तपास सुरु आहे. लवकर ही माहिती समोर येईल असे सांगितले जात आहे.

### १० लाखांचा गांजा...

ताब्यात घेतला. या कारवाईदरम्यान नितीन लिंबाजी कांदे (वय ३०, रा. कांदेवाडी ता. अंबाजोगाई) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने हा गांजा भाऊसाहेब चौधरी (रा. कडा ता. आष्टी) याच्यासह आणल्याचे सांगितले असून तो बबलू उर्फ व्यंकटेश भास्कर फड (रा. धर्मापुरी ता. परळी) याच्या सांगण्यावरून विक्रीसाठी मागविल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी नितीन लिंबाजी कांदे, भाऊसाहेब चौधरी आणि बबलू उर्फ व्यंकटेश भास्कर फड यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे,पोलीस उपनिरीक्षक घुले,पोह महादेव आवले, खरटमल मुंडे तसेच बर्दापूर पोलीस ठाण्याचे अंमलदार यांनी सहभाग घेतला.

### बीडमध्ये नऊ दिवस...

.बीडकरावर नेहमीच भगवंताची आणि संतकृपा होत असते ,येथे सातत्याने धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असतेच त्याच महाभाग्याच्या गोष्टीतून भाग्य अधिक उज्वल करण्यासाठी प्रभू श्रीरामाचे दर्शन आणि त्यानिमित्ताने कथा ,प्रवचन, रामोत्सव कल्पोक्त पूजा, सामुदायिक रामरक्षा पठण, चतुर्वेद पारायण, पाद्यपूजन असे भरगच्च विशेष कार्यक्रम आणि आशीर्वाचन सभा या रामोत्सव कालावधीत होणार आहेत. महास्वामीजींची भव्य स्वागत यात्रा बलभीम चौकापासून करण्याचे नियोजन आणि नऊ दिवस हा रामोत्सव रविराज मंगल कार्यालय येथे मोठ्या थाटात संपन्न करण्याचेही नियोजन झाले आहे.

ज्या, ज्या ठिकाणी आद्य शंकराचार्यांचे भ्रमण कालावधीत वास्तव्य राहिलेले आहे ,त्या, त्या स्थळी महास्वामीजी शंकरभारतीजी यांची ही विजय यात्रा जात आहे, त्याचाच एक भाग म्हणून बीडकरांना हे रामोत्सव सोहळ्याचे पावन पर्व प्राप्त झाले आहे. यानिमित्ताने संपन्न झालेल्या नियोजन बैठकीत समन्वयक ह भ प भार्गव महाराज जोशी यांनी या विजयात्रेबाबत सविस्तर माहिती दिली. श्री विनायक महाराज पाटंगणकर ,ड.दीपक काका कुलकर्णी, संपादक दिलीपराव खिस्ती, श्री संजयराव खंदाट साहेब,हेमंत गोदिकर महाराज,सागर देशपांडे यांनी विविध समित्या आणि कार्यक्रम रूपरेषा संदर्भात मार्गदर्शन करून हे देखणे आणि पावनपर्व ,सर्व शक्तीने साजेसे साजरे करण्यासाठी आणि सर्वांचा सहभाग ,लाभ होण्यासाठीचे मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने युवारामभक्त, धर्मप्रेमी बंधू -भगिनी, नागरिकांची उपस्थिती होती.

### शहरातील मुख्य बाजार...

प्रमाण वाढले आहे. धुळीमुळे व्यापाऱ्यांच्या मालाचे नुकसान होत असून, पावसाळ्यात या भागाला 'खड्ड्यांचे साम्राज्य' असे स्वरूप येते. आम्ही २०२२ पासून सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहोत. निवेदने देऊनही केवळ आश्वासने मिळतात, प्रत्यक्षात काम शून्य आहे. आता तरी शासनाने कोणत्याही योजनेतून हा निधी मंजूर करून रस्ते मार्गी लावावेत अशी मागणी गुरखुदे आणि देशपांडे यांनी केली आहे.

### विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर...

कागदे, गोरख साळवे, मधुकर वडमारे, बापू वडमारे, दीपक ओवाळ, बाळू कांडेकर, प्रभाकर जोगदंड, बंडू भाऊ वडमारे, प्रदीप वाघमारे, गौरीशंकर वडमारे, संजय कागदे , जितेंद्र वडमारे,गोरख गायकवाड, विनोद सोनवणे,भूषण जोगदंड,विशाल साळवे, सचिन वडमारे, राजेश जोगदंड, मनोज वडमारे, समितीची निवड पुढील प्रमाणे- अध्यक्षः-. विकास जोगदंड, उपाध्यक्षः - बाळू सोनवणे, सचिवः- देवाभाऊ वडमारे, सहसचिवः - राम वडमारे, संघटक : पप्पू साळवे, सल्लागार : अजय वडमारे, प्रताप धनवे, सतीश वडमारे, शैलेश वडमारे प्रशांत कागदे, कार्याध्यक्ष व सदस्यः- आकाश धनवे, रुपेश गायकवाड, पवन जाधव, प्रवीण वडमारे,महेश कागदे, राहुल साबळे, अक्षय वडमारे, चिंटू वडमारे, अजिंक्य वडमारे, साहिल ओवाळ, निलेश शिंदे, पंकज जोगदंड, अजिंक्य सोनवणे, आशिष यादव, कनिष्कर जोगदंड, रोहित सोनवणे, पप्पू जोगदंड, मयूर कांबळे, स्वप्निल धनवे, अक्षय कागदे, रितिक वडमारे, रोहित धवन, गिरीश वडमारे, रितेश वडमारे, या बैठकीला भीमराज नगर राजुरीवेस परिसरातील नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बळीराजा पाणंद रस्ता...

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजना सुरु केल्याबद्दल आ. पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह महायुती सरकारचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजना ही महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असून शेतकऱ्यांसाठी नवीन पायाभूत सुविधा निर्माण करणारी योजना ठरणार आहे. राज्यभर ग्रामीण भागातील शेतीशी संबंधित शेतरस्ते सुधारण्यासाठी तसेच शेतमाल योग्यवेळी बाजारपेठेत वेळेवर आणि सुरक्षित पोहोचविण्यासाठी मदत करणारी योजना ठरणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे. शासनाने या योजनेसाठी मग्रारोहयो आणि इतर १३ विविध योजनेतून निधीची तरतुद केली आहे. पंधरावा वित्त आयोग, खासदार व आमदार फंड, ग्रामपंचायतींना मिळणारे जनसुविधांकरीता अनुदान, खनिज विकास निधी, ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न यांसह इतर योजनांतून या योजनेतील कामांना निधिची तरतुद केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेच्या सक्षम अंमलबजावणीसाठी निधी अपुरा पडणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, निधीच्या कमतरतेमुळे चांगली योजना अंमलबजावणीमुळे निष्प्रभ ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणाऱ्या या योजनेच्या यशस्वीतेसाठी निधीची ठोस तरतुद करणे गरजेचे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्षाची निर्मिती करून निधीची विशेष तरतुद करावी अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली.

# पवित्र रमजान महिन्यात इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह मजकूर टाकल्याने गुन्हा दाखल

**आष्टी । प्रतिनिधी**

मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्यांमध्ये एका तरुणाने मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावतील असा मजकूर इंस्टाग्रामवर टाकल्याने सदरील तरुणावर अंभोरा, आष्टी पोलीस ठाण्यात तसेच कडा पोलीस चौकीत तक्रार दाखल करण्यात आली असून आपल्या विरोधात तक्रार दाखल केल्याची माहिती कळताच सदरील आरोपी हा फरार झाला आहे. सदरील आरोपीचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी अशी मागणी समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे पोलिसांना करण्यात आली आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील डॉ अकील बशीर सय्यद हे दिनांक २ मार्च २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आपल्या हॉस्पिटलमध्ये बसून इंस्टाग्राम अकाउंट पाहत




असताना ZR.TV.NEWS.०९ या अकाउंटवर इराण व यु ए इ या देशाच्या युद्धजन्य परिस्थितीवरील पोस्टवर धामणगाव येथील मयूर सोपान मरकड याने _mayu_markad _ या इंस्टाग्राम अकाउंट आय डी वरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावतील असा 'अल्लाह' विषयी आक्षेपार्ह मजकूर जाणीवपूर्वक टाकून पोस्ट केली होती, या प्रकरणी डॉ अकिल सय्यद यांच्या फिर्यादीवरून मंगळवार दि. ३ मार्च रोजी अंभोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. तसेच कडा येथे सोमवार दि. २ मार्च रोजी रमजान नूरमोहम्मद तांबोळी यांनी ही कडा पोलीस चौकीला सदरील तरुणा विरोधात फिर्याद दिलेली दिलेली आहे. आष्टी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा सदरील आरोपीला अटक करण्यात यावे यासाठी मोठ्या प्रमाणावर तरुण एकत्र येऊन निवेदन देण्यात आले आहे. आपल्या विरोधात तक्रार दाखल झाल्याची माहिती आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तरुणाला माहिती होताच सदरील तरून हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पुढील तपास अंभोरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके हे करत आहेत.

# मुख्याध्यापक सुधाकर तांदळे यांचा सेवापूर्ती गौरव

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्श गाव वंजारवाडी येथील रहिवासी आणि वडगाव हायस्कूल वडगाव गुंधाचे मुख्याध्यापक तांदळे एस.टी. हे नियतवयोमानानुसार ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सेवापूर्ती सन्मान सोळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येची देवता सरस्वती, काकू - नानांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थी, जाधव एम. सी, श्रीमती मोरे, दामोदर तांदळे, केशव भांगे, डॉ.स्वप्नील तांदळे, अरुण बोंगाणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना सुधाकर तांदळे म्हणाले की, स्व. काकू - नाना, मचाले मामा, यांनी कुटुंबातील सदस्य प्रमाणे प्रेम, प्रतिष्ठा, दिली असे सांगून माजी मंत्री जयदत्त अण्णा, डॉ.राजा मचाले, योगेश पवार यांनी माझा दीपस्तंभा प्रमाणे सांभाळ करून वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांचे माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर अनंत उपकार आहेत त्यांच्या उपकाराची मी परतफेड करू शकत नाही मी आयुष्यभर त्यांची उपकार विसरणार



नाही असे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. शिल्पा तांदळे यावेळी बोलताना म्हणाल्या की, सरांनी किंग मेकरची भूमिका बजावताना संघर्ष, निर्णय क्षमता, मेहनत यांचे आपण आदर्श आहात असे सांगितले. त्यांच्या अध्यक्षीय समोर प्रसंगी बोलताना डॉ. राजा मचाले म्हणाले की, स्व. काकूंनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून त्यांचा वारसा माजी मंत्री जयदत्त अण्णा हे खंबीरपणे चालवत असून या संस्थेमधून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन आज मोठ्या पदावर कार्यरत असून या संस्थेने शेकडो कर्मचाऱ्यांना नोकरी देऊन त्यांचे संसार उभे केले त्यापैकी सुधाकर तांदळे हे एक कर्मचारी असून त्यांनी संस्थेत ३३ वर्ष सेवा करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हिताचे निर्णय घेतले असल्याचे सांगून त्यांच्या पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रकाश राठोड, परमेश्वर धारकर, सुधाकर नागरगोजे, विक्रम नागरगोजे, आसाराम नागरगोजे, सुमंत गव्हाणे, नितीन नागरगोजे, श्रीकिसन गव्हाणे, व्ही. आर. शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# बीड शहरातील मूलभूत समस्या कायम; रमजानमध्ये नागरिक त्रस्त : शेख निसार

**बीड । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्यात शहरातील अनेक भागांमध्ये अंधार, पाणीटंचाई आणि अस्वच्छतेच्या समस्यांनी नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे नेते शेख निसार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला इशारा दिला आहे. गेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत शहरातील मूलभूत समस्यांना कंटाळून बीडकरांनी सत्ता परिवर्तन केले. मात्र, नगरपालिकेत सत्तांतर होऊनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नाही. जवळचे लाभार्थी कार्यकर्ते जोमात आणि सर्वसामान्य जनता कोमात, अशी टीका शेख निसार यांनी केली. शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद असून अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. रमजान महिन्यात पहाटे नमाजासाठी जाणाऱ्या मुस्लिम बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्युत खांबांवरील पथदिवे बंद असल्याने सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.याशिवाय, मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आलेली विशेष स्वच्छता मोहीम काही दिवसांतच थंडावल्याचे चित्र आहे. अनेक भागांमध्ये कचऱ्याचे ढीग अद्यापही पडून असून स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, कचरा कुंड्यांची कमतरता आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त आहेत. विशेषतः अल्पसंख्याक बहुल वस्त्या वर्षानुवर्षे



विकासापासून वंचित राहिल्याची भावना व्यक्त होत आहे. अशा भागांना विकासाच्या दृष्टीने प्राधान्य देण्याची मागणी शेख निसार यांनी केली. संविधानानुसार सत्ताधारी हे जनतेचे सेवक आहेत, स्वतःला मालक समजू नयेत, असा टोला त्यांनी लगावला. तसेच, विरोधी पक्षानेही जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी करत त्यांनी सांगितले की, रमजानच्या पवित्र महिन्यात शहरातील सर्व जनहिताचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. शहरातील वाढत्या समस्यांमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. असे पत्रकाद्वारे शेख निसार यांनी कळविले आहे.

# सनदी लेखापाल/ प्रमाणित लेखापरीक्षक यांच्या दोन दिवशीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन : आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ३ ३ २०२६ ९७ व्या घटना दुरुस्तीअन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ (अ) उपकलम (१) १९६१ चे नियम ३० अ उपनियम (६) अन्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक १०/ ९ / २०१४ रोजी सहकारी शिक्षण प्रशिक्षण देण्याकरता महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे ही शिखर संस्था अधिसूचित केलेली आहे या अधिसूचित संस्थे कडूनच प्रशिक्षण घेणे बंधनकारक केले असल्यामुळे सदर तरतुदीचे पालन आपल्याकडून होण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे ऑडिटर व कौन्सिल महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी बीड जिल्ह्यातील सर्व सनदी लेखापाल/ प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था यांना प्रशिक्षण देण्यासाठी खालील तपशीला प्रमाणे कार्यक्रमा आयोजित केलेला आहे. गुरुवार दिनांक ५/ ३/ २०२६ ते शुक्रवार दिनांक ६/ ३/ २०२६ रोजी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यालय राजुरीवेस, बीड या ठिकाणी बँकेच्या



सभागृहामध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सदरील प्रशिक्षणाचा कालावधी ठेवण्यात आलेला आहे या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सनदी लेखापाल प्रमाणित/ लेखापरीक्षक यांना लेखापरीक्षण बाबत कॅमल रेटिंग पद्धती व महत्त्व एनपीए संस्था नेटवध व भाग नेटवध, सी आर ए आर, सी डी रेशो, सहकारी कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी, जीएसटी, टीडीएस, आयकर प्रणाली, पतसंस्था नियमक मंडळ, सहकारी संस्थेच्या आर्थिक पत्रकाचे विवेचन व दोष दुरुस्ती अहवाल इतर विविध विषयावर माहिती देण्यात येणार आहे प्रशिक्षण वर्गामध्ये नोटपॅड, पेन, टी पण पुस्तिका, देण्यात येणार आहे व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या .पुणे यांचे प्रमाणपत्र देण्यात येईल सदरील प्रशिक्षणाचे शुल्क ४/३/ २०२६ पर्यंत रोखणे भरणा करून नोंदणी करावी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी न होणाऱ्या सनदी लेखापाल प्रमाणित/ लेखापरीक्षक निबंधकाच्या निर्देशाचे उल्लंघन केले या कारणासाठी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल याची नोंद घ्यावी सदर वर्गाच्या अधिक माहितीसाठी प्रशिक्षण वर्ग संयोजक एस. आर. कोळे साहेब उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांच्याशी ९८ ८१ ०४ ७६ ६५ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आव्हान बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा.बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# लिंबागणेशमध्ये उत्साहात पारंपरिक होलिका दहन

## ११ क्विंटल सरपनाची केली होळी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुका उत्सवाचे गाव म्हणून ओळख असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे यंदा होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मारुती मंदिर, लिंबागणेश समोर पारंपरिक पद्धतीने ११ क्विंटल सरपनाची भव्य होलिका दहन करण्यात आली. होलिका दहनापूर्वी विधिवत पूजन करण्यात आले. गावातील ज्येष्ठ मंडळी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत धार्मिक मंत्रोच्चारात पूजा संपन्न झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्य हलगीच्या गजरात वातावरण दणाणून गेले. हलगीच्या तालावर तरुणांनी जल्लोष करत उत्साहात होळी प्रज्वलित केली. पुर्वी गावातील पाटलांना होलिका दहन करण्याचा मान असायचा , गावातील तरुणांनी पुढाकार घेत लोकवर्गणी जमा करून ही परंपरा पुन्हा सुरू केली आहे. अनेक वर्षांपासून बंद पडलेली ही मानाची होळी पुन्हा पेटल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यावेळी हरिओम क्षीरसागर यांनी सर्व ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानत पुढील वर्षी यापेक्षा अधिक भव्य स्वरूपात होळी साजरी करण्याचा मानस व्यक्त केला. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि होळी रे होळीच्या जयघोषात लिंबागणेशची होलिका दहन उत्साहात पार पडली.

# विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी आणि तर्कशुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो : कळेकर



**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शाळेत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते त्याचे उद्घाटन शिक्षणप्रेमी विनोद कळेकर यांच्या हस्ते करण्यात आले . विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे आणि भविष्यातील शास्त्रज्ञ घडवण्यासाठी पायाभरणी करणे , नवीन कल्पनाशोध आणि प्रकल्पांना व्यासपीठ देऊन विद्यार्थ्यांना संशोधक बनण्यास प्रोत्साहन देणे, शाळेतील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला योग्य व्यासपीठ देऊन त्यांच्यातील सुप्त गुण (Skills) बाहेर आणणे या उद्देशाने शाळेत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते यामध्ये जवळ जवळ ४० विद्यार्थिनी सहभाग घेतला होता शिक्षकांनी मार्गदर्शन करून वेगेवगेळे प्रयोग मुलांना सांगितले त्या प्रमाणे मुलांनी खूप छान छान प्रयोग करून दाखविले प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना भविष्यातील वैज्ञानिक आव्हानांसाठी तयार करण्यासाठी खूप महत्वाचे आहे असे प्रतिपादन प्रदर्शनाचे उद्घाटक श्री विनोद कळेकर यांनी केले.

# आरटीई तील एक किलोमीटरची अट रद्द करा : मोरे मनीषा

**गेवराई । प्रतिनिधी**

कै . ची. ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित इरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज तलवाडा च्या प्राचार्या मोरे मनीषा यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्र फडणवीस साहेब. शालेय शिक्षण मंत्री सन्माननीय दादा भुसे साहेब शिक्षण संचालक प्राथमिक मा.शरद गोसावी यांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आले. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत आरटीइ २५% टक्के राखीव



प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने लागू केलेली एक किलोमीटर परिसर आणि दहा शाळा निवडीचे अट तातडीने रद्द करावी अशी मागणी प्राचार्या मोरे मनीषा यांनी केली. शासनाने तातडीने पुनर्विचार करावा . सदरील अट ही शिक्षणाचा मूलभूत हक्क आणि आरटीई कायद्याविरुद्ध आहे. वंचित घटकातील व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश मिळणे कठीण होणार आहे ग्रामीण भागात व शहरी भागात एक किलोमीटर परिसरात दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळा किंवा संस्था गावाच्या बाहेरच आहे अर्थात एक किलोमीटर परिसरात पुरेशा शाळा उपलब्ध नसतात तर शहरी उपनगरातही अंतराची अट असल्यामुळे पालकांना योग्य शाळा निवडण्याचा पर्याय मिळत नाही अनेक ठिकाणी दहा शाळाची निवड करणे व्यवहार्य नाही परिणामी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहण्याचा धोका आहे आरटीई प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर प्रवेशातील एक किलोमीटर ची परिसर अट तात्काळ रद्द करावी १० शाळा निवडीची सक्ती हटवावी प्रवेश प्रक्रिया सर्वसामान्य आणि ग्रामीण परिस्थितीशी सुसंगत शिक्षणाचा मूलभूत हक्क अबाधित राहील यासाठी सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करावे.एक किलोमीटर ची अट व दहा शाळा निवड यामुळे प्रवेश प्रक्रियेत ५० टक्के पर्यंत घट होण्याची भीती व्यक्त होत आहे . तसेच या जाचक अटीमुळे ग्रामीण भागातील व शहरी भागातील गरीब विद्यार्थी पात्र असूनही प्रवेशापासून वंचित राहते यामुळे सकारात्मक निर्णय घेऊ या विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा असे निवेदनाद्वारे केले आहे.

# अंबड तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' अंतर्गत सर्व विभागांच्या सेवा एकाच छताखाली

## उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिले नियोजनाचे आदेश

**अंबड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. मराअ-२०२६/प्र.क्र. ०९/समन्वय-१, दि. १८ फेब्रुवारी २०२६ अन्वये, सर्वसामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासकीय सेवा लोकाभिमुख करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१' चे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी माननीय उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या अध्यक्षतेखाली आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या उपस्थितीत सर्व तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय विभागांची संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली. सदर अभियानात केवळ महसूल विभागच नव्हे, तर ग्रामविकास ,कृषी,महिला



व बालविकास,समाजकल्याण व आदीवासी विकास,आरोग्य व इतर विभाग सहभागी होणार आहेत. प्रत्येक विभागाने आपला स्वतंत्र स्टॉल लावून लाभार्थ्यांना जागीच सेवा देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ०७ मार्च २०२६: जामखेड महसूल मंडळ,१४ मार्च धनगरपिप्री महसूल मंडळ,२२ मार्च शहागड महसूल मंडळ,२८ मार्च वडीगोद्री महसूल मंडळ,०४ एप्रिल रोहिलागड महसूल मंडळ,१० एप्रिल ताड्हदगाव महसूल मंडळ,१७ एप्रिल गोंदी महसूल मंडळ,२४ एप्रिल सुखापुरी महसूल मंडळ,०८ मे अंबड नगर परिषद,नगर पंचायत स्तर तालुक्यातील महसुल मंडळनिहाय वेळापत्रक तयार करण्यात आला आहे या अभियानाबाबत ग्रामीण भागात व्यापक जनजागृती करण्यासाठी दवंडी, सोशल मीडिया आणि प्रिंट मीडियाचा वापर करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सहाय्यक यांनी गावपातळीवर लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांना शिबिरापर्यंत आणण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडावी. गावातील सरपंचांनी या मोहिमेत पुढाकार घेऊन जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.या शिबिरासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पालकमंत्री यांच्यासह सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी (खासदार, आमदार) उपस्थित राहणार आहेत. तरी तालुक्यातील सर्व नागरिक, विद्यार्थी आणि महिलांनी या 'समाधान शिबिराचा' जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# संत तुकाराम- एक प्रबोधनकार व समाज सुधारक

संत तुकाराम( १६०८ ते १६५० ) हे महाराष्ट्रातील देहू येथील थोर वारकरी संत आणि कवी होते. संत तुकाराम यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा अंबिले ( मोरे ) १५९८ हे सुद्धा त्यांच्या जन्मा बाबतीत वर्ष सांगितले जाते. एका गरीब शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला. संसारातील कठीण काळात दुःखात व दुष्काळात त्यांनी परमार्थ साधला आणि विठ्ठलाची भक्ती केली. त्यांची अभंग रचना अतिशय सरळ कोमल आणि मानवी मनाला स्पर्श करणारी आहे. त्यांनी अंधश्रद्धेवर प्रहार केले व माणसाला जगण्याचे सत्य सांगितले. त्यांना जगद्गुरु म्हणून आदराने संबोधले जाते. कारण त्यांचे ज्ञान हे सर्वसामान्यांसाठी होते. त्यांनी जातीभेदाला न मानून प्रेम व माणुसकी वर भर दिला. ज्ञानोबांनी रचिला पाया तुका झालासे कळस अशी वारकरी संप्रदायात त्यांची महती सांगितली जाते. भागवत धर्माचा कळस मानल्या जाणाऱ्या तुकोबांनी दांभिकता अंधश्रद्धा व सामाजिक विषमता यावर परखड अभंग लिहून विठ्ठल भक्ती सामान्य माणसापर्यंत पोहोचवली. तुकाराम गाथा हे त्यांचे



जगप्रसिद्ध साहित्य असून ते एक निर्भिड समाज सुधारक संत म्हणून ओळखले जातात. बाबाजी चैतन्य हे तुकाराम महाराजांचे आध्यात्मिक गुरु होते. तुकाराम महाराजांच्या पहिल्या पत्नी रखमाबाई आणि मुलगा संतु यांचे १६३० ते ३२ च्या दुष्काळात निधन झाले. त्यानंतर त्यांनी अवली बाईंशी विवाह केला. दुष्काळात लोकांची कर्ज खते इंद्रायणी डोहात बुडवून त्यांनी खरीद समाजसेवा व पहिल्या कर्जमुक्तीचे ऐतिहासिक कार्य केले. संत तुकाराम यांनी सोळाशे पन्नास रोजी समाधी घेतली असे मानले जाते की माघ शुद्ध दशमीला ते सदेह वैकुंठाला गेले. संत तुकारामाच्या अभंगातून आपण आपले जीवन कसे जगले पाहिजे याचे ज्ञान आपल्याला मिळते. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुली यासारख्या शिकवणीतून भक्ती मानवता व समाज सुधारणेचा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या काव्यरचनेला अभंग म्हणतात. जे जीवनाचे महाभाष्य आहे. संत तुकाराम संत ज्ञानेश्वर यांनी महाराष्ट्रात भक्ती चळवळ रुजवली ही चळवळ आता खूप मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात पसरलेली आपल्याला दिसते. अभंगातून फक्त भक्ती नाही तर प्रबोधन प्रेरणादायी विचार समाजाला देणे. आजच्या काळात एका जरी अभंगाचे प्रत्येकाने आपल्या जीवनात विचार अंगीकारले तरी खऱ्या अर्थाने संतांच्या विचारांचा वारसा आपण पुढे नेला असा होईल.

**प्रा.मनीषा गिराम करपे**
**कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा**

# शहागड जय बजरंग मित्र मंडळ तर्फे होळी मोठ्या उत्साहात साजरी



**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील शहागड येथील जय बजरंग मित्र मंडळ तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आले ग्रामविकास अधिकारी सुरेशराव धोत्रे यांच्या हस्ते पूजा अर्चना करून होळी पेटविण्यात आले यावेळी जय बजरंग मित्र मंडळाचे अध्यक्ष भगवान माने,आबासाहेब पवार,अरुण धोत्रे,एकनाथ धोत्रे, गणेश डुकरे,संदीप धोत्रे,अर्जुन डुकरे, नितीन पवार, दिनेश डुकरे,योगेश परदेशी,हरिश्चंद्र धोत्रे,प्रदीप धोत्रे, मनोज धोत्रे, करण तिळवणे,सुमित इंगळे,अख्तर शेख,प्रल्हाद चोथे, विजय धोत्रे,विलास धोत्रे, प्रकाश धोत्रे,बाळू धोत्रे,सोमनाथ धोत्रे उपस्थित होते.

# सोळा गुंठे जमीन प्रकरणी उच्च न्यायालयाचा आदेश; मावेजा न दिल्याने अवमान याचिका दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेविरोधात सोळा गुंठे जमीन रस्त्यामध्ये गेल्याच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठाने जमीनमालकांच्या बाजूने निकाल देत नगरपालिकेला सहा आठवड्यांच्या आत मावेजा अदा करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. संबंधित जमीन नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांच्या वडिलांची असून ती रस्त्यात समाविष्ट करण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार नगरपालिकेने तात्काळ मावेजा देणे अपेक्षित असताना अद्यापही रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांनी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठात अवमान याचिका दाखल केली आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणात रस्ता अडविण्यात



आला आहे अशी चर्चा काही ठिकाणी होत असली तरी शिराळे बंधूंनी कोणताही रस्ता अडविलेला नसल्याचा स्पष्ट खुलासा करण्यात आला आहे. उलट नगरपालिकेच्या गुत्तेदाराने रस्त्याचे काम अपूर्ण ठेवले असल्याचे सांगण्यात आले. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी मावेजा देण्यास उदासीनता दाखविल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशाचे तातडीने पालन करून मावेजा अदा करावा आणि रखडलेले रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी संबंधितांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात काल झालेल्या विशेष अर्थसंकल्पीय सभेमध्ये नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच बीड शहरातील सर्व सन्माननीय नगरसेवकांसमोर विषय मांडण्यात आला. न्यायालयीन आदेशाचा सन्मान राखत नागरिकांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. न्यायालयाने आमच्या बाजूने स्पष्ट आदेश दिला आहे. आम्ही रस्ता अडविलेला नाही. फक्त योग्य तो मावेजा मिळावा हीच आमची मागणी आहे, असे संबंधितांनी सांगितले. नागरिकांमध्ये या प्रकरणाची चर्चा सुरू असून, आता नगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**आदर्श माध्यमिक विद्यालय बीड इयत्ता आठवी ची विद्यार्थिनी कु.श्वेता रमेश मस्के हिचा अबॅकस नॅशनल स्पर्धेत भारतातून पहिला क्रमांक. गणेश कला क्रीडा मंच स्वारगेट पुणे येथे झीरलींळींश अबॅकस मार्फत झालेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत श्वेता रमेश मस्के हिने संपूर्ण भारत देशातून प्रथम क्रमांक मिळविला.चार दिवस चाललेल्या स्पर्धेत एकूण ४५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची स्पर्धा झाली व तिच्या गटात पहिला क्रमांक मिळवत घवघवीत असे यश संपादन केले.संस्थेच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

# जिल्ह्यात श्वानदंशाच्या वाढत्या घटना चिंताजनक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान केज मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा वेधत ठोस आणि जनहितार्थ मागण्या मांडल्या. सभागृहात बोलताना त्यांनी अन्न व नागरी पुरवठा तसेच सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटींवर पेट बोट ठेवले. बीड जिल्ह्यातील आरोग्य व शेतकरी प्रश्नांवर सरकारचे लक्ष ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढल्याने श्वानदंशाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे मुंदडा यांनी नमूद केले. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये 'अँटी-रेबीज' लसींचा मोठा तुटवडा असल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. काही ठिकाणी लस उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी दवाखान्यांचा पर्याय स्वीकारावा लागत आहे, ज्यामुळे आर्थिक भार वाढतो. रेबीज हा जीवघेणा आजार आहे. लसींचा तुटवडा ही केवळ प्रशासकीय चूक नसून नागरिकांच्या जीव शी खेळ आहे, असे ठाम मत त्यांनी मांडले. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये अँटी रेबीज लसींचा मुबलक साठा तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने ग्रामीण आरोग्य सेवा कोलमडत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ही पदे तातडीने भरून आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित



केली. शासकीय रुग्णालयांमध्ये खाजगी एजन्सीमार्फत सीटी स्कॅन केले जात असले तरी रुग्णांना केवळ लेखी अहवाल देण्यात येतो. डिजिटल फिल्म किंवा सीडी देण्यास नकार दिला जातो, अशी तक्रार त्यांनी सभागृहात मांडली. परिणामी, रुग्णांना दुसऱ्या तज्ज्ञांकडे जाताना पुन्हा तपासणी करावी लागते. प्रत्येक सीटी स्कॅननंतर रुग्णाला सीडी देणे बंधनकारक करावे आणि अहवाल पात्र रेडिओलॉजिस्टकडूनच द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

## बर्दापूर पोलीस ठाणे हद्दीत मोठी कारवाई

# १० लाखांचा गांजा जप्त; तिघांवर गुन्हा दाखल एकजण ताब्यात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई उपविभागातील बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई करत पोलिसांनी सुमारे ३३ किलो ३६० ग्रॅम गांजा जप्त केला असून या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे, तर तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या गांज्याची बाजारभावानुसार किंमत सुमारे १० लाख ८०० रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार, ४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.२० वाजण्याच्या सुमारास मुर्ती फाटा, पट्टीवडगाव रोडलगत धर्मापुरी (ता. परळी) येथील शेतातील कच्च्या विटांच्या खोलीत पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत दोन पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये ओलसर व उग्र वास येणारा पान, फुल, बिया व बोंडे असलेला दाबलेला गांजा आढळून आला. तपासणीदरम्यान एका पोत्याचे वजन २४ किलो ५६० ग्रॅम तर दुसऱ्या पोत्याचे वजन ८ किलो ८०० ग्रॅम असे एकूण ३३ किलो ३६० ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला. बाजारभावानुसार प्रति किलो ३० हजार रुपये दराने त्याची एकूण किंमत अंदाजे १०,००,८०० रुपये इतकी ठरविण्यात आली. दोन्ही पोत्यांमधून पंचांसमक्ष फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रत्येकी २०० ग्रॅम असे एकूण ४०० ग्रॅम नमुने काढून ते सील करून पुढील तपासासाठी जप्त करण्यात आले. उर्वरित गांजा पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत सील करून जप्ती पंचनामा करून » पान २ वर

# इराण-इस्त्रायल युद्धाची बीडच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना झळ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील तेलघना येथील शेतकऱ्यांवर सध्या इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या या संघर्षामुळे कांद्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली असून, त्याचा थेट फटका स्थानिक बाजारपेठेतील दरांना बसला आहे. आपल्या शेतातील कांदा विक्रीसाठी हैदराबादला नेणाऱ्या शेतकऱ्यांना तिथे अत्यंत कमी भाव मिळाल्याने आपले अश्रू अनावर झाले. आधीच अवकाळी पावसाने पिकाचे नुकसान केलेले असताना, आता शिल्लक राहिलेल्या मालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. आखाती देशांतील युद्धामुळे निर्यातीचे मार्ग बंद झाल्याने कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. दरवर्षी साधारणपणे २५ ते ३० रुपये मिळणारा भाव यंदा पूर्णपणे कोसळला असून, शेतकऱ्यांचा

लागवड खर्चही निघणे कठीण झाले आहे. तेलघना गावातील अनेक शेतकऱ्यांची हीच व्यथा असून, अनेकांनी बँक आणि सावकारांकडून घेतलेले कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत ते आहेत. कांदा शेतातच सडून खराब होत असल्याने उत्पादकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने कांद्याला किमान ३० रुपये हमीभाव द्यावा, अशी मागणी येथील हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी केली आहे. जर वेळीच सरकारी मदत मिळाली नाही, तर शेतकरी आणि त्यांची कुटुंबे पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन रस्त्यावर येतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. एका बाजूला युद्धाचा जागतिक परिणाम आणि दुसऱ्या बाजूला अस्मानी संकट अशा कात्रीत बीडचा कांदा उत्पादक शेतकरी सापडला असून, आता प्रशासनाकडून ठोस मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# 'सिटीझन' कार्यालयातील गोंधळाची चौकशी करुन; खोटे गुन्हे मागे घ्या - शेख इर्शाद

**बीड । प्रतिनिधी**

सिटीझन कार्यालयात झालेल्या गोंधळप्रकरणी बीड शहर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं. ५७/२०२६ संदर्भात चौकशी करुन खोटे गुन्हे मागे घेण्याची मागणी शेख इर्शाद यांनी पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शेख इर्शाद अब्दुल रज्जाक (रा. बालेपीर, नगर रोड, बीड) यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व्हे नं. ४२, तरफ गिराम येथील प्लॉट क्र. २ व ३ (एकूण ६००० चौ. फूट) बाबत दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी इसार पावतीद्वारे व्यवहार करण्यात आला होता. संबंधित इसार पावतीचा गैरवापर करून तृतीय पक्षासोबत पुढील व्यवहार करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. करारनाम्यात नमूद मुदतीत संपूर्ण रक्कम अदा न झाल्याने व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित आर्थिक व्यवहाराच्या पार्श्वभूमीवर काही व्यक्तींमध्ये वाद झाला. त्या वेळी चर्चेसाठी बोलावण्यात आल्यानंतर दै. सिटीझन कार्यालयात गोंधळ निर्माण झाला व किरकोळ नुकसान झाले. मात्र या घटनेशी माझा किंवा माझ्या भावाचा कोणताही संबंध नसताना गुन्ह्यात नाव घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच, दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ कालावधीतील सकाळी ६.०० ते ९.०० वाजेपर्यंतचे दै. सिटीझन कार्यालयाचे संपूर्ण सीसीटीव्ही फुटेज जप्त करून तपासण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.



# गेवराई पोलिसांची नेकनूरमध्ये मोठी कारवाई चोरीच्या ५० दुचाकी जप्त

## टेम्पो मध्ये भरुन सर्व दुचाकी गेवराईकडे रवाना

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई पोलिसांनी नेकनूर येथे कारवाई करीत यामध्ये चोरीच्या तब्बल ५० दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. एकाचवेळी इतक्या मोठ्या प्रमाणात दुचाकी सापडणे ही कदाचित पहिलीच घटना असवी अशी चर्चा करण्यात येत आहे. या दुचाकी एका टेम्पोत भरुन त्या गेवराईकडे रवाना झाल्या आहेत. जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात दुचाकी चोरीच्या घटना घडत असून, अनेक कारवाया झाल्या पण या दुचाकी चोरीच्या घटना काही थांबण्याचे नाव घेत नाही. यामुळे पोलीस दुचाकी चोरांच्या मागावर आहे. याच दरम्यान गेवराई पोलिसांना नेकनूर येथे चोरीच्या दुचाकींचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक आणि कर्मचाऱ्यांनी नेकनूर येथे छापा टाकला असता त्यांना विविध कंपनीच्या तब्बल ५० दुचाकी मिळून आल्या आहेत. चोरटे या दुचाकी चोरुन येथे आणून लावत होते अशी चर्चा » पान २ वर



# अवैध वाळू वाहतूक प्रकरणात ट्रॅक्टरसह २५.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

## • जिल्हा वाहतूक शाखेची कारवाई; चालका विरुद्ध गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई करत जिल्हा वाहतूक शाखेच्या पथकाने ट्रॅक्टरसह सुमारे २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी संबंधित चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी विष्णू मुंडे (वय ४०) हे जिल्हा वाहतूक शाखा, बीड येथे कार्यरत आहेत. ४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास कळंबा परिसरात पेट्रोलिंग करत असताना अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करत एमएच २३ एयू ३५९६ क्रमांकाचा ट्रॅक्टर पकडला. ट्रॅक्टरमध्ये नदीपात्रातून काढलेली सुमारे ६ ब्रास वाळू आढळून आली. ट्रॅक्टरची किंमत सुमारे २५ लाख रुपये तर वाळूची किंमत सुमारे ३० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी एकूण २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संबंधित चालकाविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# शहरातील मुख्य बाजार पेठेतील रस्त्यांची दुरवस्था

## बलभीम चौक ते कारंजा टॉवर या मार्गांचे सिमेंटिकरण करावे- गुरखुदे, देशपांडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराचे हृदय समजल्या जाणाऱ्या कारंजा टॉवर ते माळीवेस आणि बलभीम चौक परिसरातील रस्त्यांची गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली आहे. अनेक महिन्यांपासून स्थानिक नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही नगरपरिषद प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आले आहे. कारंजा टॉवर ते पिंगळे गल्ली, जुनी भाजी मंडई, शहर पोलिस स्टेशन, कबाड गल्ली ते माळीवेस आणि माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक ते कारंजा टॉवर या वर्दळीच्या मार्गांचे डांबरीकरण/सिमेंटिकरण तात्काळ करण्यात यावे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे किंवा संबंधित नगरविकास विभागाकडे विशेष पाठपुरावा करण्याची मागणी नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि भाग्यश्री देशपांडे यांनी निवेदनाद्वारे



मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. हा भाग मुख्य बाजारपेठेचा असल्याने येथे मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याचे » पान २ वर

# बीडमध्ये नऊ दिवस चतुर्भुजपट्टा भिमरामोत्सोव

**बीड । प्रतिनिधी**

अज्ञानाचा व पापाचा नाश करणारे पराभवनामक सवंसर घेऊन हे नववर्ष गुढीपाडवा पासून सुरू होत आहे. या पावन पर्वात योगानंदेश्वर सरस्वती मठ, कृष्णराज नगर म्हैसूर ,कर्नाटक येथील महास्वामीजी शंकर भारतीजी यांची 'विजय यात्रा' भारतभर सुरू असून १८ ते २९ मार्च दरम्यान बीडमध्ये पावन पर्वाचा लाभ होणार आहे. चतुर्भुजपट्टाभिरामाचे दर्शन या निमित्ताने रामोत्सव कालावधीत बीडकरांना होत आहे. या सुवर्णकालावधीचा मोठ्या संख्येने लाभ घेता यावा यासाठी नुकतीच एक व्यापक बैठक दत्त मंदिर येथे संपन्न होऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली आहे » पान २ वर



दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव
Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV